शनिवार, दि. १३ डिसेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ११० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### आ.अर्जुनराव खोतकर यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारला धारेवर धरले

# मुजोर अधिकारी, विमा कंपन्यांवर दंडात्मक कारवाईची मागणी

**नागपूर -** महायुती सरकारने शेतकऱ्यांसाठी ३१ हजार कोटीचे पॅकेज दिल्याबद्दल एकीकडे धन्यवाद देत असतानाच जालन्याचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर आक्रमक होत सरकारला धारेवर धरले. सीसीआय आणि नाफेड मार्फत शेतमालाची खरेदी करून योग्य भाव द्यावा तसेच तांत्रिक चुकांमुळे मुजोर अधिकारी आणि विमा कंपन्याकडून अडवणूक होत असल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी,अशी ठोस मागणी केली.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आक्रमक झालेले आमदार खोतकर यांनी सुरुवातीलाच सांगितले की, माझ्या संपूर्ण आयुष्यात पहिल्यांदाच मी इतक्या मोठ्या प्रमाणात झालेली अतिवृष्टी पाहिली आहे. शेतकरी उध्वस्त होत असताना त्याच्या प्रश्नाकडे कोणालाही कानाडोळा करता येणार नाही. कधी अल्प तर कधी मोठी अतिवृष्टी यामुळे शेतकरी कायम संकटात सापडलेला आहे. त्यातच त्याला योग्य भाव मिळत नाही. अशा परिस्थितीत सरकारने नाफेड आणि सीसीआय मार्फत शेतमालाची खरेदी करायला पाहिजे. अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी ३१ हजार कोटीचे पॅकेज दिल्याबद्दल शासनाला धन्यवाद दिले पाहिजे. परंतु अजूनही अनेक शेतकऱ्यांना या अनुदानाचा लाभ मिळालेला नाही. मुजोर अधिकारी आणि प्रशासन यास कारणीभूत आहे. तांत्रिक चुका पुढे करून शेतकऱ्यांची अडवणूक केली जात आहे. यासंदर्भात एक महिला शेतकरी रेणुका कोकाटे आणि वाघरूळ सर्कल मधील गावांची उदाहरणेही आमदार खोतकर यांनी सभागृहात सादर केली. वाघरूळ सर्कलमधील पाऊस मोजमाप यंत्राच्या बिघाडामुळे तेथील शेतकऱ्यांना विम्याचा लाभ होऊ शकला नाही.

> घरकुलाच्या बाबतीतही शासनाकडून केवळ एकच हप्ता मिळाला असून उर्वरित रक्कम त्वरित द्यावी. कारण घरकुल बांधताना लाभार्थींनी व्याजाने पैसे काढलेले आहेत. त्यामुळे घरकुल देऊनही त्याचा उपयोग होणार नाही. शेतकऱ्यांना कर्जमाफी करणे आता अनिवार्य झाले आहे. याशिवाय तो जगू शकणार नाही. आत्महत्या वाढतील. हेही आ. खोतकर यांनी निदर्शनास आणून दिले. दरम्यान, महसूल मंत्री आणि समाजकल्याण मंत्र्यांनी दखल घेत पीक विमा आणि घरकुल यासंदर्भात उत्तरे दिली.

वास्तविक प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत दौरा सुरू असतानाच अतिवृष्टी झाली. त्या भागातील एक धरणही रात्रीतून भरले. परंतु पाऊस मोजण्याच्या यंत्रावर अतिवृष्टीची नोंद झालेली नव्हती. कृषी आणि महसूल मधील त्या भागातील कर्मचारी मोठा पाऊस झाल्याचे सांगत असताना वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांकडून मात्र नोंद घेतली गेली नाही. त्यामुळे वाघरूळ सर्कलमधील १५ ते २० गावांना लाभ मिळू शकला नाही. याबाबत त्वरित कार्यवाही व्हावी.

**शेतकऱ्यांची थट्टा**

कडवंची परिसरातील आठ ते दहा गावातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळू शकला नाही. वास्तविक हेक्टरी १९ हजार रुपये शेतकऱ्यांनी द्राक्ष विमा भरला आणि त्यांना केवळ हेक्टरी ७ हजार ४८६ रुपये मिळाले. ही शेतकऱ्यांची थट्टा नाही तर काय? असा सवालही आमदार खोतकर यांनी उपस्थित केला.

यावर्षीच्या अतिवृष्टीत शेतकऱ्यांची घरे, जमिनी वाहून गेल्या. विहिरी बुजल्या. पिके कुजली, सडली. सांगता येणार नाही एवढी हानी झाली. माझ्या जालना तालुक्यात १२५ कोटीची मागणी केली, परंतु केवळ




३०% च रक्कम मिळाली आहे. पंचनामे केले, मागणी केली मात्र त्या तुलनेत निधी मिळाला नाही हे वास्तव आहे. याशिवाय ड्रोन सर्व्हे, पंचनामे अपलोड झाले नसल्याने विमा कंपन्यांनी तांत्रिक कारणे पुढे करत शेतकऱ्यांना विमा नाकारला आहे. तेव्हा विमा कंपन्यांवर दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे. मराठवाडा ग्रीडसाठी केंद्र सरकारकडून निधी देण्यास टाळाटाळ होत आहे. त्याकडे तातडीने लक्ष देण्यात यावे. माझ्या मतदारसंघातील हातवन तलाव मंजूर होऊन वीस वर्षे झाले आहेत. शेतकरी जमिनी देण्यासही तयार आहेत. परंतु सरकारकडून तलावाच्या उभारणीस विलंब होत आहे. जालना नांदेड समृद्धी महामार्गावरील शेतकरी २३० दिवसांपासून योग्य मोबदला मिळावा यासाठी आंदोलन करीत आहेत. आत्मदहनाचा प्रयत्नही झालेला आहे. याकडे जर यापेक्षा अधिक कानाडोळा झाला तर काहीही घडू शकेल. तेव्हा सरकारला तोंड दाखवायलाही जागा राहणार नाही असा इशाराही आमदार खोतकर यांनी दिला. एकीकडे शेतकरी महिलांना शेतीसाठी कर्ज घ्यावयाचे असल्यास आयटी रिटर्न दाखवावे लागते आणि आयटी रिटर्न दाखविले तर लाडक्या बहिणींच्या योजनेचा लाभ घेता येत नाही. तेव्हा आयटी रिटर्नची अट शिथिल करावी असेही आमदार खोतकर यांनी लक्षात आणून दिले.

---

युवा आदर्श

## शरद ऋतु ...

जन सेवा करताना
पावसात भिजलात
बदलूनि गेला ऋतु
विरोधकी वासलात
भक्कम पायावरती
उभे राही वादळात
पाही होऊन चकीत
बाकीजाती गाळात
भुमी सकस कराया
दम लागतो पाळात
मनापासून जनसेवा
असो इच्छा मुळात
आघाडी सक्षम होई
इतरे जन ते घोळात
निघालेला अश्वमेध
बाकीअडके बोळात
मुंगळे बाजू जमतात
गोडवा असा गुळात
सामाऊन घेई सर्वां
ताकदअसते जळात
साहेबांची दिशास्पष्ट
बाकी गुंगले घोळात
वेगळा समृद्ध समुद्र
माणिकमोती तळात

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा**
**झाडे जगवा**

---

## बिबट्यासाठी शेळ्या सोडणारे मंत्री गरिबांच्या शेतकऱ्यांच्या नुकसानी कडे लक्ष देतील काय? - बोरशे गुरुजी

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** मंत्री महोदयाच्या सुपीक डोक्यातून आलेली बीबट्यांनो उपाशी काय राहता शेळ्या खा! योजना आणि जनतेचे होणारे नुकसान याचा कोणताही संबंध लावण्याची मंत्रि महोदयाला गरज वाटत नाही.कारण ते मंत्री आहेत ना!

काल माझ्या कपाशीच्या शेतात धनगर बंधुनी मेंढ्या चारण्यास आणल्या होत्या !रात्री अज्ञात प्राण्याने ( लांडगा / बीबट्या ) त्यांची एक मेंढी मारली ! आता पर्यंत आठ दहा मेंढ्या वेगवेगळ्या ठिकाणी मारुन जंगली प्राण्यांनी खाल्ल्याने नुकसान झाल्याचे तो बांधव धाय मोकलुन रडून सांगत होता. एक बैल मेल्याचेही सांगत होता.शासन व प्रशासनाने दखल घ्यावी ही विनंती मी प्रशासनातील जबाबदार अधिकाऱ्यांच्याकडे पाठवली आहे बघू त्या बिच्यार्याला नुकसान भरपाई मिळते काय? नुकसान धारकाचे नांव गंगाराम नाना तांबे रा.नादगांव ता.नांदगाव जि नाशिक. ९५२९९४७४८८असे असुन गट नं. २१२ करजगांव ता.भोकरदन जि.जालना दिनांक १२ /१२ / २०२५ रोजी ही घटना घडली आहे. वादळ वाऱ्यात पाण्या पावसात सतत भटकंती करून जीवाची पर्वा न करता आपल्या शेळ्या मेंढ्यांना लेकराप्रमाणे जपणारे हे लोकं झालेले नुकसान जीवाला मारुन सहन करत असतात. जंगली प्राण्यांच्या हल्ल्यामध्ये तसेच नैसर्गिक आपत्तीच्या वेळी त्यांचे अतोनात नुकसान होते.

आज-काल जंगलामध्ये हरणांची संख्या वाढलेली आहे तसेच रोही या प्राण्यांची संख्या सुद्धा वाढलेली आहे अनेक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये शेतमालाचे हे प्राणी नुकसान करत आहेत. त्यातच बिबट्याच्या व लांडग्यांच्या दहशतीने शेतामध्ये जाणे शेतकऱ्यांच्या जीवाला धोका होईल अशी भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे रात्री बेरात्री शेतामध्ये जाणे शेतकऱ्यांना धोक्याचे झाले आहे. त्यातच बिबट्यांना खाण्यासाठी शेळ्या सोडण्याची शक्कल मंत्री महोदयाच्या सुपीक डोक्यातून बाहेर आलेली आहे.त्या शेळ्या बिबट्यांना भोजन म्हणुन कामात येतील की,शेतकर्यांच्या शेतमालाचे नुकसान वाढवतील हे मंत्री महोदयच सांगु शकतील. शेळ्या शेतमालात नाही तर गुपचुप जंगलातुन चरुन बिबट्याला शोधत शोधत बिबट्यांकडे जातील आणि बिबट्यांची भुक भागवतील. अशा प्रकारे अतिशय परिश्रम व विचार करुन सुंदर अशी बीबट्यांनो उपाशी काय राहता शेळ्या खा! योजना सुरु होत आहे.

अशाप्रकारे आपले लोकप्रतिनिधी जनतेची पर्वा न करता स्वतःच्या स्वार्थासाठी योजना बनवत असतात. नुकतेच नागपूर अधिवेशनाच्या निमित्ताने मंत्र्यांनी आणि लोकप्रतिनिधींनी चंगळ करून घेतली. कोट्यावधी रुपयाचा चुराडा केला. या सर्व खटाटोपा मधून जनतेच्या पदरात काय टाकले. याचा हिशोब प्रत्येकाने आपल्या मनाशी करणे गरजेचे पान २ वर

---


## स्वच्छता मंथनसाठी जलसंसाधन विशेषज्ञ प्रा. गोसाईं जालन्यात

**जालना । प्रतिनिधी -** पाण्याच्या विज्ञानाचे महामार्ग उघडणारे जलसंसाधन विशेषज्ञ व आयआयटी दिल्लीचे प्रा. ए. के. गोसाईं जालना फर्स्टच्या पुढाकाराने १७ डिसेंबर रोजी आयोजित मंथन परिषदेसाठी जालन्यात येत असून, नदी, हवामान आणि शहर या तिघांमध्ये संबंध जोडण्यावर ते मार्गदर्शन करणार आहेत.

भारताच्या पाणीव्यवस्थापन क्षेत्रात काही नावे अशी आहेत की ज्यांचा उच्चार जरी केला तरी समस्या सोडवण्याची आशा जागृत होते. त्यापैकी एक म्हणजे प्रा. ए. के. गोसाईं. जलसंधारण, हवामानबदल, नदीप्रवाह विश्लेषण, आणि जलस्रोत नियोजन या विषयांमध्ये त्यांचा दशकानुदशकांचा अभ्यास केवळ शास्त्रापुरता मर्यादित नाही; तो देशातील अनेक शहरांच्या भवितव्याला दिशा देणारा आहे.

देशभरातील जलव्यवस्था प्रश्न अधिक गुंतागुंतीचे होत असताना, गोसाईं यांचे काम अधिकच महत्त्वाचे ठरत आहे. त्यांचा अभ्यास हा पुस्तकांचा नव्हे, तर जमिनीवरच्या अनुभवांचा, बदलत्या ऋतूंच्या मोजमापांचा आणि शेकडो प्रकल्पांच्या परिणामांचा आहे. गोसाईं यांची खासियत म्हणजे ते पाणी हे केवळ संसाधन नाही, तर जीवंत प्रणाली आहे हे समजतात.

ते सांगतातः शहरांमध्ये येणारे पूर हे फक्त पावसामुळे होत नाहीत-ते शहरांच्या वाढीच्या पद्धती, डोंगर-कड्यांचे उपयोग,



जमिनीतील बदल, आणि माणसाच्या सवयींशी थेट जोडलेले असतात. त्यामुळे उपाययोजना करताना विज्ञान, समाज आणि प्रशासन - तिन्हींच्या सांधण्या एकत्र येतात.

या दृष्टिकोनामुळेच त्यांच्या संशोधनांनी अनेक शहरांना-विशेषतः पाण्याच्या कमतरतेशी झुंजणाऱ्यांना-उपाय आणि रणनीती दिल्या आहेत त्या म्हणजे डेटा विज्ञान + मानवी अनुभव प्रभावी उपाय

प्रा. गोसाईं हे अत्याधुनिक मॉडेलिंग, सॅटेलाइट डेटा, हवामान-पॅटर्न आणि नदीच्या प्रवाहाचा अभ्यास वापरून जलव्यवस्थापनाचे चित्रच बदलून टाकतात.

ते मांडतात ती माहिती केवळ वैज्ञानिक नसते; ती स्थानिक माणसांच्या अनुभवांशी जोडलेली असते. त्यांचे सादरीकरण ऐकताना एका ग्रामीण शेतकऱ्याच्या डोळ्यातला प्रश्न आणि शहर नियोजकाच्या नकाशावरची रेषा - दोन्ही अचानक अर्थपूर्ण होतात.

**बदलाची धडाडी असलेल्या शहरांसाठी प्रेरणा**

आज अनेक भारतीय शहरे पाणीटंचाई, सांडपाणी व्यवस्थापन, पूरस्थिती आणि भूजल घटण्याच्या संकटांना सामोरी जात आहेत. गोसाईं यांच्या कल्पना या केवळ तांत्रिक नसून कार्यक्षम पायाभूत बदलांचे मार्गदर्शन आहेत. जालनासारख्या शहरात, जे जलस्रोत आणि भविष्यातील विकास या दोन्हींच्या संवेदनशील वळणावर उभे आहे, त्यांच्या कल्पना आणि अनुभव किती मोठा बदल घडवू पान २ वर

---

### नागपूर अधिवेशन : ‘सुयोग भवन’वरील मक्तेदारी संपवण्यासाठी पत्रकार संघाचे सर्वोतोपरी प्रयत्न

# सर्व पत्रकारांसाठी समान सुविधा द्याव्यात

### भरत मानकर यांचे सरकारला आवाहन

**नागपूर । प्रतिनिधी -** विधिमंडळ व मंत्रालय संपादक पत्रकार संघाच्यावतीने नागपूर हिवाळी अधिवेशनादरम्यान पत्रकारांच्या राहण्याच्या सुविधांवरील मक्तेदारीविरोधात तीव्र भूमिका घेतली आहे. सुयोग भवन हे अधिवेशन काळात पत्रकारांना राहण्यासाठी सरकारकडून उपलब्ध करून दिलेले अधिकृत निवासस्थान असून, काही निवडक पत्रकारांची येथे दीर्घकाळपासून मक्तेदारी असल्याचा आरोप संघाने केला आहे.

**भरत मानकर यांचे आवाहन**

दैनिक जनश्वासचे संपादक भरत मानकर म्हणाले की- नागपूर अधिवेशनासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पत्रकार येतात. केवळ मुंबईतील पत्रकारच सरकारच्या नाकातील मोती नाहीत. तरीही काही ठराविक पत्रकारांसाठीच सुयोग भवन आरक्षित करून ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे. ही मक्तेदारी मान्य नाही.

त्यांनी सांगितले की, काही पत्रकारांनी सुयोग भवनातील फलक रातोरात बदलून स्वतःसाठी जागा राखून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांना आता भीती निर्माण झाली आहे. राज्यातील ईतर भागातील पत्रकार या ठिकाणी यापुर्वी येत नव्हते. आता पत्रकार जागा झाला आहे. आमची संघटना पत्रकरांना जागे करण्याचे काम करत आहे. अशा पद्धतीने फलक बदलण्याचे काम सरकारने करू नये.

यापुर्वी या प्रकारासाठी विधिमंडळ व मंत्रालय संपादक पत्रकार संघाने तातडीने न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर सरकारने अधिवेशनासाठी नवीन एसओपी तयार केली.

**‘सुयोग भवन’ म्हणजे काय?**

नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात राज्य सरकारकडून पत्रकारांसाठी उपलब्ध करून दिलेले अधिकृत निवासस्थान साधारणपणे मोठ्या संख्येने येणाऱ्या पत्रकारांपैकी काहींचीच पूर्वीपासून येथे ‘मक्तेदारी’ खोलींचे वितरण अनेकदा पारदर्शक नसल्यानं जिल्हास्तरीय आणि ग्रामीण माध्यमांतील पत्रकारांना राहण्याची व्यवस्था मिळण्यात अडचणी येतात.

**संघाची मागणी**

मानकर यांनी स्पष्ट केले, सुयोग भवन महाराष्ट्रातील सर्व पत्रकारांना समान अधिकाराने उपलब्ध करून द्यावे. पत्रकार कोणत्याही जिल्ह्यातून आला असला तरी DGIPR (माहिती व जनसंपर्क महासंचालनालय) कडे नोंदणी केल्यावर त्याला सुयोगमधील राहण्याचा हक्क असावा. खोली वाटपाची प्रक्रिया पूर्णतः पारदर्शक व ऑनलाइन असावी. काही पत्रकारांनी मक्तेदारी निर्माण करून इतरांना अडवण्याचा प्रयत्न केल्यास, त्यांना कायद्याच्या भाषेत उत्तर दिले जाईल, असा स्पष्ट इशाराही मानकर यांनी दिला.

**सर्वोतोपरी प्रयत्न करू**

भरत मानकर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले, सुयोग भवनावर काहींची मक्तेदारी राहू देणार नाही. सर्व पत्रकारांसाठी समान सुविधा मिळाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. यासाठी संघाच्यावतीने सर्वोतोपरी प्रयत्न केले जातील.

नागपूर अधिवेशनात पत्रकार येण्याची संख्या मोठी असते. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र तसेच कोकणातील पत्रकार अनेक वर्षांपासून सुयोग भवनात राहण्याची मागणी करत होते. मात्र खोली वाटपात पारदर्शकता नसल्याच्या तक्रारींचा पाढा मोठा आहे. या पार्श्वभूमीवर यंदाच्या अधिवेशनापूर्वीच संघाने सरकारकडे आवाज उठवला असून आता एसओपीमुळे परिस्थिती बदलण्याची आशा निर्माण झाली आहे.

संपादकीय पान

# अभ्यासक्रमात संविधान घ्या...

नुकताच २६ नोव्हेंबरला संपूर्ण देशात संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. अमृत महोत्सवी संविधान दिना निमित्त संपूर्ण देशात संविधानाचा जागर करण्यात आला. ठिकठिकाणी विविध उपक्रमांद्वारे संविधानाचे महत्व अधोरेखित करणारे कार्यक्रम, उपक्रम राबवण्यात आले मात्र संविधान दिन हा फक्त एक दिवसाचा सोहळा ठरता कामा नये वास्तविक संपूर्ण वर्षभर संविधानाचा जागर व्हायला हवा. दौंड मधील 'आम्ही भारताचे लोक' ही सामाजिक संघटना वर्षभर म्हणजे वर्षातील ३६५ दिवस संविधानाचा जागर करते. संविधानाच्या एका कलमा वर दररोज विस्तृत चर्चा केली जाते. संविधानाने दिलेले हक्क आणि अधिकार सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्याचे काम ही संघटना करते. या संघटनेच्या या कार्याचे खरोखरच कौतुक व्हायला हवे. आम्ही भारताचे लोक संघटनांसारख्या वर्षभर संविधानाचा जागर करणाऱ्या संघटना अतिशय कमी आहेत म्हणूनच नागरिकांमध्ये संविधानाबाबत अद्यापही म्हणावी तशी जागृती होऊ शकली नाही. संविधान लागू होऊन आज ७६ वर्ष उलटली तरी नागरिकांना आपले हक्क आणि अधिकार माहीत नाहीत म्हणूनच संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करण्याची वेळ आली आहे. संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करावा ही खूप जुनी मागणी आहे मात्र त्याला अद्यापही म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही. नाही म्हणायला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या पदवीचे शिक्षण घेणाऱ्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना दोन श्रेयांकाचा,( क्रेडिट कोर्स) शिकवला जात आहे मात्र हा कोर्स घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या त्यामानाने खूप कमी आहे म्हणूनच संविधान हा विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करावा. आज आपल्या देशात लाखो विद्यार्थी पदवीधर होतात पण आपल्या संविधानाचा अभ्यास अतिशय कमी विद्यार्थ्यांना असतो. उच्च शिक्षित असूनही संविधानाची जुजबी माहितीही विद्यार्थ्यांना नसते. शालेय अभ्यासक्रमात नागरिकशास्त्र हा विषय शिकवला जातो तो पण त्रोटक स्वरूपात शिकवला जातो त्यात संविधानाची माहिती नसते. स्थानिक स्वराज्य संस्था, त्यांचे कार्य - अधिकार, निवडणूक, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद, लोकप्रतिनिधींनिंची जबाबदारी, अधिकार अशा स्वरूपाचीच माहिती नागरिक शास्त्रात पाहायला मिळते त्यामुळे संविधानाबाबत उच्च शिक्षित विद्यार्थी अज्ञानीच असतात. त्यांचे हे अज्ञान दूर होण्यासाठी संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश होणे गरजेचे आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत हक्क, कर्तव्य, अधिकार यांचा समावेश आहेच पण देशाचा आदर्श कारभार कसा करावा याचेही नियम आहेत. समता, बंधुता यांचीही शिकवण संविधानात आहे. संविधानामुळेच देश अखंड आहे. संविधान हा लोकशाहीचा पाया आहे. संविधान हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. संविधान आपला राष्ट्रीय ग्रंथ आहे. भारताचे संविधान शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले तर राज्याच्या आणि राष्ट्राच्या उभारणीत ते योग्य दिशेने आपापल्या क्षेत्रात कार्य करू शकतील म्हणूनच हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट होणे ही काळाची गरज आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

पान १ वरुन

## बिबट्यासाठी शेळ्या ...

आहे. सध्या प्रत्येक जन नाकात वारा शिरल्याप्रमाणे जे मनाला येईल त्याप्रमाणे वागत आहे. जे मनात येईल त्याप्रमाणे बोलत आहे. एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत आहेत. त्यामध्ये जनतेचा वेळ आणि जनतेचा पैसा वाया जात आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे याचे कोणालाच सोयरसुतक नाही. जनतेचे प्रश्न सोडवायचे तर यांचेच प्रश्न जनतेला दररोज वादातून ऐकावी लागतात आणि यासाठीच आपण या लोकप्रतिनिधींना निवडून दिले काय ? असा प्रश्न सर्वसामान्यांना पडतो. राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढलेल्या आहेत. अवैध धंदे वाढलेले आहेत. शेतकऱ्याला शेती परवडत नाही व्यापाऱ्याला व्यापार परवडत नाही अशी परिस्थिती आणून ठेवली आहे. शेतकरी हालाखीचे जीवन जगत आहे. शेतकऱ्याला निसर्गाची साथ नाही. प्रशासनाची साथ नाही. शेतकरी कल्याणाचे कोणते टिकाऊ धोरण शासनाकडे नाही.एखादी तटपुंजी मदत शासनाने जाहिर केली तर शेतकऱ्याच्या पदरामध्ये प्रशासन पडू देत नाही. लाच दिल्याशिवाय कोणत्याच सरकारी कार्यालयात काम होत नाही. त्यामुळे सर्वसामान्य माणूस कोणाकडेही न बोलता गुपचूप आलेल्या अडचणी व दुःख सहन करत आहे. परिस्थिती जास्त बिघडण्यापूर्वी लोकप्रतिनिधींनी जन माणसाच्या मनाची चाहूल घेऊन राज्यातील जनतेचे प्रश्न काळजीने सोडवणे गरजेचे आहे.

## स्वच्छता मंथनसाठी ...

शकतात याची कल्पनाच पुरेशी आहे.

प्रा. ए. के. गोसाईं यांचा अभ्यास, त्यांचे अनुभव आणि त्यांची समजूतदार, शांत पण प्रभावी संवादशैली पाहून वाचकाच्या मनात एकच विचार येतो. आपल्या शहराने जर अशा तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळवलं तर? आपल्याकडील जलप्रश्नांचा चेहराच बदलला जाईल. सर्वांनी त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

# अवैध होर्डिंग्ज राजकीय पुढाऱ्यांचे शुभचिंतक का लावतात, त्यांना कोणीच ओळखत नाही काय?

नागपूरच्या हिवाळी अधिवेशनदरम्यान वर्धा मार्गावरील मेट्रोच्या खांबावर ६0 पेक्षा अधिक अवैध होर्डिंग्ज लावण्याची गंभीर दखल मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने घेतली आहे.न्यायालयाने महापालिकेला शहरातील सर्व अवैध होर्डिंग्ज २४ तासांच्या आत हटवण्याचे कठोर आदेश दिले आहेत याचे मनापासून स्वागत.तसेच आयुक्तांनी अवैध होर्डिंग्ज काढण्याच्या कारवाईचा अनुपालन अहवाल सादर करावा लागेल,असेही आदेश नमूद केले.म्हणजे राजकीय पुढारी चांगल्या व स्वच्छ शहराला विद्रूपिकरण करतांना दिसतात त्यामुळे न्यायालयाने अत्यंत महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे.आपण जेव्हा स्वच्छ नागपूर, स्वच्छ शहर, स्वच्छ राज्य म्हणतो तेव्हा अशा परिस्थितीत नेत्यांच्या स्वागतासाठी शहरभर पोस्टर्स,बॅनर्स,कट-आऊटस व होर्डिंग्ज लावण्याची काय गरज? राज्यातील पुढाऱ्यांचे होर्डिंग्ज लावने म्हणजे यांना कोणीच ओळखत नाही का?त्यामुळे तर होर्डिंग्ज लावत असावेत असे तर नाही ना!असाही प्रश्न उपस्थित होतो. एका शब्दात सांगायचे म्हणजे आपण यांना पाहिलत काय असेच काही असावे असे मला वाटते.अवैध होर्डिंग्जचा कायदा अनेक वर्षांपासूनचा आहे तरी राजकीय पुढारी नियमांची पायमल्ली करून स्वतःच्या प्रसिद्धीसाठी संपूर्ण नियम धाब्यावर ठेवतात हे कसले लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी यांना तर जनता निवडून देते यांना राज्याला किंवा शहराला ओळख दाखविण्याची गरजच काय? त्यामुळे यांना कशाला हवी प्रसिद्धी आणि आपल्या प्रसिद्धीसाठी संपूर्ण नियम धाब्यावर ठेवतात हा तर लोकशाहीचा,सर्वसामान्यांचा, कायद्याचा व नियमांचा मोठा अपमानच म्हणावा लागेल. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनासाठी आलेल्या नेत्यांच्या स्वागतासाठी शहरात अवैध होर्डिंग्ज लावण्यात आले यावर दिनांक १० डिसेंबर बुधवारला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा जोरदार दणका बसला या होर्डिंग्ज बहादरांना कारणे दाखवा नोटीस बजावून प्रत्येकी पाच लाख रुपये उच्च न्यायालयात जमा करण्याचे निर्देश का दिले जाऊ नये,अशी विचारणा करावी,असा आदेश न्यायालयाने महानगरपालिका आयुक्तांना दिला.मी तर म्हणनेल की ज्या-ज्या राजकीय पुढाऱ्यांचे अवैध होर्डिंग्ज दिसत असेल अशांच्या आमदारकीवर लगाम कसली पाहिजे व शुभचिंतक व राजकीय पुढारी यांच्यावर पाच लाख रुपये नाही,तर १० लाख दंड आकारला पाहिजे.तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांमध्ये व शुभचिंतकामध्ये सुधारणा होईल. आपणाला कल्पना असेल की राज्यामध्ये अवैध होर्डिंग्जच्या अनेक जिवघेण्या घटना झाल्या आहेत ही बाब माहीत असुनही अवैध होर्डिंग्ज लावतात ही दुर्भाग्यपुर्ण बाब आहे.यामध्ये मुंबई परिसरात घाटकोपर येथे दिनांक १३ मे २०२४ ला वादळीवारा व पाऊस आला यामध्ये मोठ्या प्रमाणात मुंबईकरांचे नुकसान झाले. त्याचप्रमाणे स्थानिक प्रशासन व सरकारच्या हलगर्जीपणामुळे मुंबईत असलेल्या अवैध होर्डिंग्जने १४ मुंबईकरांचा बळी घेतला व ८0 पेक्षा जास्त गंभीर जखमी झालेत होते.त्याचीच पुनरावृत्ती दिनांक २ ऑगस्ट २०२४ ला ठाणे जिल्ह्यातील कल्याणमध्ये सहजानंद चौकात एक भलेमोठे होर्डिंग्ज ४0 फुट उंचीवरून कोसळले होते यात दोन जण गंभीर जखमी झाले होते.अशीच घटना कल्याणमध्येही होर्डिंग्ज कोसळल्याने झाली होती.त्यामुळे अवैध होर्डिंग्जच्या बाबतीत प्रश्न निर्माण होतो की,नागरिकांचा जीव कवडीमोलाचा झाला आहे का?त्यामुळे सरकारने, प्रशासनाने अवैध होर्डिंग्जच्या बाबतीतील गांभीर्य लक्षात घेऊन होर्डिंग्ज मालकांवर,शुभचिंतकावर व राजकीय पुढाऱ्यांवर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. कोणतेही अवैध होर्डिंग्ज असो त्याचे गंभीर परिणाम सामान्य नागरिकांना भोगावे लागतात.अवैध होर्डिंग्ज लावणाऱ्यावर सरकारने व प्रशासनाने कठोर कारवाई करावी जेणेकरून भविष्यात होर्डिंग्जनी होणाऱ्या दुर्घटना रोखण्यास प्रशासनाला मोठी मदत होईल व विद्रुपीकरण टाळता येईल यावर सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. महापालिका किंवा प्रशासनाने जाहिरातदारांना किंवा राजकीय पुढाऱ्यांना अवैध होर्डिंग्जबद्दल नोटीस बजावुन सुध्दा होर्डिंग्ज हटवत नसेल तर कठोर कारवाई झालीच पाहिजे.अवैध होर्डिंग्जवरून असे लक्षात येते की राजकीय पुढारी,जाहिरातदार व मनपा प्रशासन यात काही साठगाठ तर नाही ना!अशी शंका सर्वसामान्य नागरिकांच्या मनात नेहमीच भेडसावत असते.वाहतूक सिग्नलसह दिशादर्शक व सावधानतेचा इशारा देणाऱ्या फलकांवर किंवा त्याजवळ होर्डिंग्ज लावल्यास वाहनचालकांचे लक्ष विचलित होते त्यामुळे त्यांचे अपघात होतात.तसेच अवैध होर्डिंग्ज शहराचे आणि देशाचे विद्रुपीकरण करते. वाहनचालकाचे होर्डिंग्जकडे जेव्हा अचानक लक्ष जाते तेव्हा मोठ्या दुर्घटना होण्याची शक्यता असते आणि अशाप्रकारच्या दुर्घटना सुध्दा झाल्या आहेत.या संपूर्ण घटनांची दखल राजकीय पुढारी,जाहिरातदार, शुभेच्छा देणारे नेते यांनी घेतली पाहिजे.देशाला,राज्याला व शहरांना स्वच्छ व सुंदरतेच्या दिशेने न्यायचे असेल तर होर्डिंग्जच्या बाबतीत राजकीय पुढारी व जाहिरातदार यांच्या मुसक्या आवळणे अत्यंत गरजेचे आहे आणि त्या दिशेने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने वाटचाल सुध्दा सुरू केली आहे.त्यामुळेच शहरातील चोवीस तासांत २८0३ अवैध होर्डिंग्ज हटले. अशीच कारवाई संपूर्ण राज्यात सन्माननीय उच्च न्यायालयाने करावी अशी मी आग्रहाची विनंती करतो. जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९0७७९, नागपूर.**

# सिकलसेल जनजागृती सप्ताह; सिकलसेल आजार टाळता येतो

सिकलसेल या आजारामध्ये रक्ताच्या पेशी या विळया सारख्या होत असल्यामुळे या आजाराला सिकलसेल असे म्हणतात. महाराष्ट्रामध्ये अंदाजे २.५ लक्ष सिकलसेलचे रुग्ण आहेत. हा आजार अधिवासी भागात जास्त प्रमाणात आढळुन येतो. या रोगाचे निर्मुलन सन २०४७ पर्यत करण्याचे उदिद्ष्ट आहे. म्हणुन या आजाराची जनजागृती व माहिती व्हावी याकरिता दरवर्षी ११ ते १७ डिसेंबर २०२५ या सप्ताह मध्ये सिकलसेल जनजागृती करण्यांत येते.

हा आजार अनुवांशिंक आहे. वाहक व पिडीत असे दोन प्रकारचे रुग्ण सिकलसेल मध्ये आढळुन येतात. वाहक या प्रकारामध्ये सिकलसेलचे लक्षणे दिसुन येत नाही अर्थात पिडीत व्यक्तीमध्ये लक्षणे दिसुन येतात. या दोन्ही प्रकारापैकी एकाने विवाह केल्यास होणाऱ्या अपत्याला सिकलसेल हा आजार होण्याची शक्यता असते. विवाहपुर्वी रक्त तपासणी केल्यास हा आजार आपण टाळु शकतो.

लक्षणे :- रोगप्रतिकार शक्ती कमी, रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा निर्माण होणे, हात पाय दुखणे, ऑनिमिया होणे, कावीळ इ.

निदान :- रक्ताची तपासणीद्वारे (सोल्सुबीलीटी, इलेक्ट्रोफोरेसीस) रोगनिदान करता येते.




औषधोपचार :- हायड्रोक्सियुरिया (Hydroxyurea), संसर्गाचा प्रतिकार करण्यासाठी प्रतिजैविके आणि तांबडया पेशी निर्मितीसाठी फॉलिक ॲसिड टॅब, व्हिटामिन सप्लिमेंटस् इ.औषधोपचार वैद्यकिय अधिकारी यांच्या सल्ल्यानुसार दिले जातो. इेपश चरींु ढीरपीश्रिरपीं ही महागडी उपचार पध्दती आहे.

प्रतिबंधात्मक उपाययोजना :- अनुवांशिक आजार असल्यामुळे विवाहपुर्वी सिकलसेलची तपासणी करावी. सर्व शासकिय रुग्णालयात मोफत तपासणी उपलब्ध आहे. नवजात बालकांची तपासणी करणे, स्क्रिनींग वाढविणे, विवाह योग्य जोडपी व सिकलसेलग्रस्तांचे समुपदेशन करणे.

आवाहनः- विवाहपुर्वी सिकलसेलची तपासणी करु या, सिकलसेल टाळु या

**(डॉ. जयश्री भुसारे)**
**जिल्हा आरोग्य अधिकारी,**

# सनबर्न फेस्टिवल ; संस्कृतीचा नैतिक ऱ्हास

संपूर्ण विश्वात भारतीय संस्कृती महान आणि प्रेरणादायी आहे. येथील सांस्कृतिक, धार्मिक, पौराणिक, लोकपरंपरेचा अभिमान सर्वांनाच आहे. इथल्या संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी आजही विदेशातील लोक येथे येतात. प्रत्येकच देशाला गौरवशाली इतिहास असतो; तो पूर्वइतिहास जतन करतांना असंख्य स्वाभिमान वृध्दींगत करणाऱ्या घटना घडत असतात. तसेच त्याची दखल जागतिक पटलावर सुद्धा घेतली जात असते. भारतीय संस्कृतीचा हा वारसा पुढे पुढे न्यायचा असतो. पूर्वापार चालत आलेल्या संस्कृतीचे संवर्धन करणे आणि रक्षणाची जबाबदारी संस्कृतीचे वाहक म्हणून, त्या देशाच्या नागरिकांवर आणि देशाचे नियमन करणाऱ्या शासनकर्त्यांवर असते. खरे तर याचे सभान असायलाच हवे. जागतिकीकरणाच्या युगात मानवी जीवनात अमुलाग्र बदल होताना बघायला मिळतो. एकीकडे भारतीयांचा मोठा सण प्रकाशोत्सव 'दीपावली' चा जागतिक पटलावर युनोस्कोच्या वारसा स्थळात नोंद करण्यात आल्याचे वृत्त असतानाच; दुसरीकडे राज्यातील राजधानी मुंबईत आपल्या संस्कृतीला गालबोट लावणाऱ्या सनबर्न फेस्टिवलचे आयोजन होत आहे. तशी रीतसर परवानगी शासनाने दिलेली आहे.कुठलाही देश हा केवळ भूभाग नसतो, तर भूतकाळातील महान, महानुभावंच्या,विद्वानांच्या, ऋषीमुनी,थोर समाजसुधारक, क्रांतिवीरांच्या बलिदानाने, सजलेली, नटलेली, त्याग,प्रेम,आस्थेने, समर्पित सदभावनेने मशागत केलेली भूमी असते. अशा या महान पावनभूमीचे आपण वारस आहोत. या भूमीच्या जडणघडणीत श्रम, नीतीमूल्यें, आदर्शांचे सुसंस्कार झाले. दुदैवाने आज मात्र विस्मरण होतांना दिसते. ज्याप्रमाणे देशाच्या सीमेची रक्षण करणे अस्मितेचा भाग आहे.तद्वतच आपल्या संस्कृतीचे रक्षण करणे ही तेवढेच महत्त्वाचे ठरते. जागतिकीकरणाचा प्रभाव म्हणावा की, सांस्कृतिक मूल्याचे विस्मरण.आज भारतीय संस्कृतीत पाश्चिमात्य संस्कृतीचे पाय झपाट्याने घट्ट रोवले जात आहे. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे डिसेंबर मध्ये मुंबईच्या शिवडी उपनगरात होऊ घातलेल्या सनबर्न फेस्टिवलकडे बघून म्हणता येईल. सनबर्न फेस्टिवल हा भारतातला सर्वात मोठा इलेक्ट्रॉनिक नृत्य संगीत, ईडीएम महोत्सव आहे. आणि हा एक मनोरंजन ब्रँड आहे. जो थेट डीजे सादरीकरण,पाश्चात्य नृत्य, जीवनशैलीला प्रोत्साहित करतो. याची सुरुवात सर्वप्रथम सनबर्न फेस्टिवल चे संस्थापक शैलेंद्रसिंग यांनी २००७ ला गोव्यातून केली. सनबर्न फेस्टिवलचे आयोजन मुख्यत्वे बिग बी एंटरटेनमेंट या कंपनीमार्फत केले जाते. या महोत्सवाचे प्रमुख उद्दिष्ट पाश्चिमात्य संगीत, कला, युवा संस्कृती यांना एकत्र आणणे आहे. ज्यात मोठे आंतरराष्ट्रीय डीजे परफॉर्म करतात.जो एक मोठा इडीएम महोत्सव आहे. यंदा दिनांक १९ ते २१ डिसेंबर च्या दरम्यान चालणारा इलेक्ट्रॉनिक डान्स म्युझिक फेस्टिवल आहे. यावरून हा फेस्टिवल कसा असेल, याचा अंदाज बांधता येईल. डीजेचा ठेका, चकाकणारे लायटिंग, लेजर शो, बेधुंद तरुणाई असे या सनबर्न फेस्टिवलची थोडक्यात वर्णन करता येईल. हा आशियातील सर्वात मोठा, तर जगातील पहिल्या फेस्टिवल पैकी एक म्युझिक फेस्टिवल असल्याचा दावा केला जात आहे. ज्यात विविध पश्चिमात्य संगीतासह बेधुंद होऊन तरुणाई रात्रभर थिरकते. विविध खाद्यपदार्थ, पाश्चिमात्य पेय, अमली पेयांचा सुद्धा समावेश असतो. असे हे सनबर्न फेस्टिवलचे दर्शनी स्वरूप असते. सनबर्न फेस्टिवल हा प्रामुख्याने २००७ पासून ते २०१६ पर्यंत गोव्यात भरत होता. असंख्य वादाच्या मुद्द्यावरून गोवा सरकारने त्यावर बंदी लादली. गोव्यातून हद्दपार झाल्यानंतर, तो महाराष्ट्रात होत आहे. त्याला महाराष्ट्र सरकारने रीतसर परवानगी सुद्धा दिली आहे. हा फेस्टिवल पहिल्यांदाच महाराष्ट्रात होतो आहे, असे नव्हे तर यापूर्वी पुण्यात ते आयोजित करण्यात आला होता.ज्यावेळी हा फेस्टिवल चे आयोजन होते तेव्हा तो वादात आणि मोठ्या प्रमाणात चर्चेचा विषय बनतो. त्याचे कारणही तसेच आहे. सनबर्न फेस्टिवल कडे केवळ संस्कृतीचे हनन करण्यापुरता मर्यादित नसून, शासनाचे महसूल बुडविणारा सुद्धा आहे. वर्ष २००९ , २०१४ आणि २020 मध्ये सनबर्न फेस्टिवलच्या आयोजकांनी गोव्या राज्याचा ६ कोटी २९ लाख रुपये कर बुडवीला होता.या संदर्भात सप्टेंबर २०२५ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने १ कोटी १० लाख रुपये सुरक्षा ठेव जप्तीचा आदेश दिला होता. तर १०१६ ला पुण्यातील केसनंद येथे सनर्बन फेस्टिवलचे आयोजनाच्या प्रसंगी राज्य शासनाचा ४१ लाख ९६ हजार रुपयांचा मुद्रांक सुद्धा बुडविला होता. शिवाय पाच हजार चौरस किलोमीटर वरील गौण खनिजांचे नुकसान केले होते. त्या करीता शासनाने ६0 लाखाचा दंड सुद्धा ठोठावल्याचे याची वृत्त होते.



एकंदरीत शासनाचा कर बुडविणाऱ्या, संस्कृतीचे हनन करणाऱ्या, आणि तरुणाईचे नैतिक पतन करणाऱ्या सनबर्न फेस्टिवलला प्रशासन अनुमती देते हा गहन प्रश्न पडणे स्वाभाविकच आहे. सनबर्न फेस्टिवलच्या माध्यमातून कोणता आदर्श जगापुढे मांडायचा? अशा प्रश्नांना धरून शासन प्रशासनावर टीकेचा भडीमार होत आहे. बहुसंख्येने असलेल्या देशातील तरुणाईला चंगळवादाकडे नेणारा एकंदरीत हा फेस्टिवल आहे. ज्यात मोठ्या प्रमाणे ड्रग्स व तत्सम पदार्थाची विक्री,प्रसार, प्रचार होत असतो.धनदांडग्याची तरुणाई मौज मजेच्या लालसेपाई आपुसकच या फेस्टिवल कडे वळतात. विकृत अशा सनबर्न फेस्टिवल च्या माध्यमातून अमली पदार्थाच्या आहारी गेल्याचे वृत्त समाज माध्यमात आहे. एवढेच नव्हे तर अमली पदार्थाच्या अति सेवनाने मृत्यू झाल्याचेही वृत्त यापूर्वी प्रसिद्ध झालेले होते. विकृत, चंगळवादी,पैशांचा अपव्यय, नैतिक पतन, शासकीय महसुलाला चुना लावणाऱ्या सनबर्न फेस्टिवलची पार्श्वभूमी असतानाही, शासन परवानगी कशी देते? राज्यात आणि देशात असंख्य समृद्ध संस्कृती आणि वारसा आहेत,ज्या व्दारे विदेशी पर्यटक भारतीय संस्कृतीशी जुळतील. सरकारने त्यांना प्रोत्साहन द्यावे. पर्यटन वाढवावे आणि पाश्चात्य संस्कृतीला प्रोत्साहन देणाऱ्या; आणि भारतीय तरुणाई देशाचे जी देशाची उज्वल भविष्य आहे, अशांना व्यसनाच्या विळख्यात ढकलणाऱ्या षडयंत्रांना कायमचे हद्दपार करण्यासाठी जागृती व्हावी हीच अपेक्षा.असे खऱ्या अर्थाने झाले, तर राज्याची सांस्कृतिक अस्मिता निश्चितच कायम राहील.

**शशिकांत म.तोटे**
**दारव्हा,जि.यवतमाळ**
**मो :९१३०८३५४५८**

# आयकर रिटर्न भरा, अपघात नुकसान भरपाईचा हक्क मिळवा

## ॲड. महेश धन्नावत यांचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** उत्पन्न असूनही केवळ आयकर रिटर्न दाखल न केल्याने अनेक अपघातग्रस्त आणि त्यांचे कुटुंबीय त्यांना कायदेशीररित्या मिळू शकणाऱ्या नुकसान भरपाईपासून वंचित राहत आहेत. जालना जिल्ह्यातील अनेक नागरिक चांगले उत्पन्न मिळवत असूनही, आयकर रिटर्न दाखल करण्याबाबत उदासीन असल्याचे दिसून येते. त्यामुळे अपघात झाल्यास किंवा दुर्दैवी मृत्यू ओढवल्यास, न्यायालयात उत्पन्नाचा ठोस पुरावा सादर करता येत नाही आणि परिणामी त्यांना मिळणारी नुकसान भरपाईची रक्कम अत्यंत कमी होते किंवा नाकारली जाते. ही अत्यंत गंभीर बाब असून, नागरिकांनी आपले आर्थिक भविष्य सुरक्षित करण्यासाठी आणि कायदेशीर हक्क अबाधित ठेवण्यासाठी वेळेवर आयकर रिटर्न दाखल करावे, असे कळकळीचे आवाहन नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी केले आहे.

ॲड धन्नावत यांनी नुकत्याच एका महत्त्वाच्या न्यायालयीन निकालाचा संदर्भ देत या विषयाचे गांभीर्य अधोरेखित केले. कलकत्ता उच्च न्यायालयाने एका मोटार अपघात दाव्याच्या प्रकरणात (संध्या राणी जना विरुद्ध आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इन्शुरन्स कं. लि.) अत्यंत महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. या निकालानुसार, मोटार अपघात दाव्यांमध्ये पीडित व्यक्तीचे उत्पन्न निश्चित करण्यासाठी दाखल केलेले आयकर रिटर्न हे एक विश्वसनीय आणि अधिकृत आधार मानले जाईल. न्यायमूर्ती बिस्वरूप चौधरी यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, एकदा आयकर विभागाने व्यक्तीचे 'इन्कम टॅक्स रिटर्न' स्वीकारले की, ते पीडितेच्या उत्पन्नाबाबत एक अधिकृत दस्तऐवज बनते.

**न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण:**

कलकत्ता उच्च न्यायालयाने आपल्या निकालात म्हटले आहे की, जर एखाद्या व्यक्तीने आयकर रिटर्न दाखल केले नसेल, तर दावेदारांना उत्पन्नाचा दावा सिद्ध करण्यासाठी बँकेचे पासबुक, व्यवसायाची हिशेबपत्रके आणि इतर कागदपत्रे सादर करावी लागतात. मात्र, जेव्हा आयकर रिटर्न दाखल केलेले असते आणि त्याची पडताळणी आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत केली जाते, तेव्हा त्या रिटर्नवर अविश्वास दाखवण्याचे कोणतेही कारण उरत नाही.

सदर प्रकरणात, मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांनी दाखल केलेले तीन वर्षांचे आयकर रिटर्न विचारात न घेता, अपघात न्यायाधिकरणाने उत्पन्न कमी गृहीत धरले होते. उच्च न्यायालयाने हे अयोग्य ठरवले आणि म्हटले की, जेव्हा पीडित व्यक्तीच्या हयातीतच आयकर रिटर्न दाखल केलेले असते, तेव्हा त्यात उत्पन्न वाढवून दाखवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. न्यायालयाने हे देखील स्पष्ट केले की, पगारदार व्यक्तीचे उत्पन्न त्याच्या सॅलरी स्लिपवरून सिद्ध करता येते, परंतु स्वयं-रोजगारित व्यक्तीच्या बाबतीत, आयकर प्राधिकरणासमोर त्याने स्वतः घोषित केलेले उत्पन्न हाच उत्पन्नाचा अधिकृत पुरावा असतो. याच तत्त्वावर आधारित, सर्वोच्च न्यायालयाने देखील विविध निवाड्यांमध्ये आयकर रिटर्नला उत्पन्नाचा एक महत्त्वाचा वैधानिक दस्तऐवज म्हणून मान्यता दिली आहे.

**जालन्यातील परिस्थिती आणि ॲड. धन्नावत यांचे आवाहन:**

ॲड. धन्नावत यांनी चिंता व्यक्त केली की, जालना आणि परिसरातील अनेक व्यापारी, व्यावसायिक आणि शेतकरी चांगले उत्पन्न मिळवतात, परंतु कायदेशीर प्रक्रियेच्या अज्ञानामुळे किंवा निष्काळजीपणामुळे आयकर रिटर्न भरत नाहीत. अपघात ही एक अनपेक्षित घटना आहे. अशावेळी, जर कुटुंबातील कमावत्या व्यक्तीचा मृत्यू झाला किंवा त्याला अपंगत्व आले, तर नुकसान भरपाई हा कुटुंबासाठी मोठा आर्थिक आधार असतो. परंतु, केवळ रिटर्न दाखल न केल्यामुळे हा हक्क नाकारला जातो. कलकत्ता उच्च न्यायालयाच्या निकालाने हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे की, न्यायालयात उत्पन्नाचा पुरावा म्हणून आयकर रिटर्नला किती महत्त्व आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, नागरिकांनी केवळ कर वाचवण्यासाठी किंवा प्रक्रिया टाळण्यासाठी रिटर्न दाखल करणे टाळू नये. कर्ज प्रकरण, व्हिसा प्रक्रिया आणि विशेषतः अपघात नुकसान भरपाईसारख्या महत्त्वाच्या कायदेशीर प्रक्रियांमध्ये आयकर रिटर्न एक अनिवार्य आणि अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज आहे. त्यामुळे, सर्व पात्र नागरिकांनी आपले आणि आपल्या कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी नियमितपणे आयकर रिटर्न दाखल करावे.

# नैसर्गीक अनुदान घोटाळा; अपहार करणारा तलाठी प्रवीण सिनगारे यास आर्थिक गुन्हे शाखेकडून अटक

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी तालुक्यात झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यामध्ये शासनाने वेळोवेळी ०४ जी आर काढुन बाधित शेतकऱ्यांना अनुदान जाहीर केले होते. त्यामध्ये अंबड व घनसावंगी तालुक्यात यादया अपलोडींगचे काम काज करणारे संबधत अधिकारी कर्मचारी यांनी मोठया प्रमाणावर बोगस (शेती नावावर नसलेले) नावे यादया मध्ये अपलोड करुन त्यांचे नावे आलेल्या शासनाचे अनुदानाची रक्कम त्यांचे कडुन परस्पर परत घेतल्या संबंधी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्यामुळे तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी सदर प्रकरणात सत्यता पडताळणी साठी चौकशी समीती गठीत केली होती.

चौकशी समीतीने चौकशी करुन एकुण २४० गावामध्ये रु २४,९०,७७,८११/- इतक्या शासकीय रकमेचा अपहार झाला असल्या बाबत अहवाल दिल्यानंतर सदर प्रकरणात पोलीस स्टेशन अंबड येथे गुन्हा रजि. क्र. ४५३/२०२५ कलम ३१६(४), ३१६(५), ३१८(४), ३२४(५), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३३९, २३८, ३(५) इछ्ड सह कलम ५२, ५३ आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक साहेब जालना यांचे आदेशान्वये आर्थिक गुन्हे शाखा जालना करीत आहे. सदर गुन्हयात यापुर्वी १० आठ आरोपीतांना अटक करण्यात आलेले आहे. सदर गुन्हयातील फरार आरोपींचा शोध घेणे कामी रवाना होऊन आरोपी नामे प्रवीण भाऊसाहेब सिनगारे वय ३६ वर्षे, रा. पारा ता. वाशी जि. धारशिव हा तब्बल चार महीन्या पासुन वेळोवेळी मोबाईल व ठिकाणे बदलुन पोलीसांना लोकेशन मिळु नये याची पुर्ण खबरदारी घेवुन अटकपुर्व जामीन मिळविण्यासाठी आटोकाट प्रयत्न करुन पोलीसां पासुन लपुन राहणारा आरोपी धारशिव जि. धाराशिव येथे मिळुन आल्याने त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीसह एकुण ११ आरोपीतांना अटक करण्यात आर्थिक गुन्हे शाखेला यश आलेले असुन फरार आरोपीतांचा शोध सुरू आहे.

सदरची कामगीरी ही अजयकुमार बंन्सल पोलीस अधीक्षक जालना, आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक जालना, सिध्दार्थ माने प्रभारी पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, यांचे मार्गदर्शनाखाली मिथुन घुगे स.पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, पोलीस अंमलदार गोकुळसींग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, अंबादास साबळे, गजानन भोसले, सागर बावीस्कर, दत्ता वाघुंडे, विष्णु कोरडे, ज्ञानेश्वर खुने, रविंद्र गायकवाड, शुभम तळेकर, श्रेयस वाघमारे, चालक पाठक मेजर, महिला अंमलदार, जया निकम, निमा घनघाव, मंदा नाटकर यांनी पार पाडली.

# ध्वज दिन निधी संकलनाचे उद्दीष्ट पूर्ण करावे - जिल्हाधिकारी


**जालना । प्रतिनिधी -** सशस्त्र सेना ध्वज दिन भारतीय सशस्त्र दलातील शूर सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांच्या योगदानाबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी तसेच विशेषतः आपले सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांकरीता विविध कल्याणाकारी योजना राबविण्यासाठी आणि मदत करण्यासाठी साजारा केला जातो समर्पित. जिह्याला ध्वज दिन निधी संकलनाचे २०२५ साठी ४६ लाख ५० हजार रूपयांचे उद्दीष्ट असून, सर्व विभागांनी आपले उद्दीष्ट पूर्ण करावे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले. येथील जिल्हा सैनिक कार्यालयात आज सशस्त्र सेना ध्वजदिन २०२५ निधी संकलन शुभारंभाच्या कार्यक्रमात श्रीमती मित्तल बोलत होत्या. यावेळी पोलीस उपनिरिक्षक आर. डी. निकाळजे, उपशिक्षणाधिकारी (मा.) अनिल पवार, शिक्षणाधिकारी (प्रा.) संजय कायंदे, जॉन नवगिरे आणि जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्क्वॉड्रन लिडर डॉ. रुपाली मानमोडे यांची उपस्थिती होती. जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यावेळी म्हणाल्या की, सशस्त्र सैना दलाचे जवान व अधिकारी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अहोरात्र देशाच्या सीमांचे रक्षण करत असतात. त्यामुळेचे आपण येथे सुरक्षित व शांतते जीवन जगतो. सशस्त्र सैना दलाचे जवान व अधिकारी आपल्या जीवाची आणि आपल्या कुटूंबीयांची पर्वा न करता देश आणि आपल्या सर्वांच्या रक्षणासाठी सीमेवर सदैव तैनात असतात. देशाच्या रक्षणाची भूमिका बजावत असताना आपले जवान सैनिक सण, समारंभ, कार्यक्रम यांचा विचारही न करता ते सतत देशसेवा करत असतात. अशा लष्करी अधिकारी व जवानांची आणि त्यांच्या कुटूंबियाची काळजी घेणे ही आपणां सर्वांची नैतीक जबाबदारी आहे. या जबाबदारीच्या भावनेतून सशस्त्र सेना ध्वज निधी संकलन करण्याच्या सत्कार्याला मदत करणे प्रत्येकाचे कर्तव्य असल्याचे ही श्रीमती मित्तल यांनी यावेळी यावेळी सांगितलते.

मान्यवरांच्या हस्ते यावेळी वीर माता-पिता, वीर पत्नी, गुणवंत विद्यार्थी तसेच ध्वज दिन निधीचे उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या विभाग प्रमुखांचा सत्कार करण्यात आला. तसेच प्रारंभी सशस्त्र सेनेचे प्रतिक असलेले छोटे ध्वज वितरित करुन निधी संकलनाची सुरुवात करण्यात आली.

## वारकरी संत साहित्य संमेलन, जालना; संमेलनाध्यक्ष डॉ. रामकृष्णदास लहवितकर महाराज यांच्या भाषणाचा सारांश

# भक्तिमार्ग हाच कलियुगात तारक; कीर्तनकार हाच खरा लोकशिक्षक' - डॉ. रामकृष्णदास लहवितकर महाराज

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि जेईएस महाविद्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वारकरी संत साहित्य संमेलन-२०२५ , (दि. १३ आणि १४ डिसेंबर, २०२५) जेईएस महाविद्यालय, जालना येथे संपन्न होत आहे. संमेलनाध्यक्ष श्रीमहंत महामंडलेश्वर द्वाराचार्य विद्यावाचस्पति डॉ. रामकृष्णदास लहवितकर महाराज अध्यक्षीय भाषण खास आमच्या वाचकांसाठी सारांश रूपाने देत आहोत.



ऐतिहासिक औचित्य: त्रिवेणी संगम

संमेलनाचे औचित्य: संत ज्ञानेश्वरांची ७५० वी जयंती, संत नामदेवांचे ६७५ वे संजीवन समाधी वर्ष आणि जगद्गुरू संत तुकारामांचे ३७५ वे वैकुंठ गमनाचे वर्ष या 'त्रिवेणी संगमा' निमित्ताने हा 'अमृतप्रवाह' जालन्यात आयोजित केला आहे.

परंपरा: हजार वर्षांपूर्वी पंढरीच्या वाळवंटात झालेले वारकरी आणि कीर्तनकारांचे संमेलन व आषाढी-कार्तिकी वारीच्या रूपात सुरू असलेली परंपरा, यामुळे हे नव्या पर्वातील पहिले नियोजित ऐतिहासिक संमेलन आहे.

भक्तिमार्गाची अनन्य आवश्यकता

कलियुगात तारक मार्ग: आजच्या कलियुगात भक्तिमार्ग हाच अध्यात्म साधनेसाठी सर्वांत सुलभ मार्ग आहे. पूर्वीच्या युगांमध्ये सत्यनिष्ठा आणि निष्काम कर्म असल्याने व्यक्तिगत साधना पुरेशी होती. मात्र, आजच्या युगात त्याउलट वर्तन असल्याने साधना क्लेशदायक झाली आहे.

कीर्तन परंपरेचा पुरस्कार: ही गरज लक्षात घेऊन पूर्वीच्या ऋषीमुनींनी नारद प्रवर्तित कीर्तन परंपरेचा पुरस्कार केला. या भक्तिमार्गाने व्यवहारमग्न समाजालाही सश्रद्ध आणि जास्तीतजास्त निष्काम कर्ममार्गाने वर्तन करण्यास प्रवृत्त करता येते.

वारकरी संप्रदाय: या गरजेतून निर्माण झालेल्या संप्रदायांमध्ये वारकरी संप्रदाय अधिक लोकाभिमुखतेने कार्यरत झाला.

संतांचे वचन:

संत ज्ञानेश्वर माऊली: 'समाधिसाधन संजीवननाम। शांति दया सम सर्वांभूती ||' हा हरिनाम भक्तीपंथ शांती देणारा ज्ञानपंथ आहे.

संत नामदेव महाराज: 'याजसाठीं हरिनाम निरंतरी। तारील निर्धारी भाक माझी ||' कीर्तनाचे महत्त्व अधोरेखित करून हाच मार्ग तारक असल्याची ग्वाही देतात.

प्रत्येक वारकरी हाच कीर्तनकार

वारी म्हणजे हरिकीर्तन: पंढरीची वारी ही अखंडपणे हरिनामगजरात होणारे सामूहिक हरिकीर्तन आहे.

सामूहिक साधना: वारीतील प्रत्येक वारकरी मुखी हरिनाम, अंतःकरणात हरिचिंतन आणि निष्काम कर्मयोगाची साधना करीत असतो. टाळकरी, मृदंगाचार्य, पताकाधारी, तुळसीवृंदावन वाहक, मुखाने नाम गाणारा प्रत्येक वारकरी मनाने कीर्तनकारच असतो.

ज्ञानप्रबोधिनी व प्रबोधक: वारी ही ज्ञानप्रबोधिनी आहे आणि त्यातील प्रत्येक वारकरी हा प्रबोधकच आहे.

सेवा व समभाव: संत तुकाराम महाराजांच्या 'कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचें ||' या अभंगातील अभेदाचे वर्म म्हणजेच ज्ञान आणि म्हणूनच वारकरी 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञान दीप लावू जगी ||' ही घोषणा जगतो.

डिजिटल युगातही कीर्तन संस्था लोकशिक्षणाचे साधन

प्रसारमाध्यमांपेक्षा वेगळेपण: प्रसारमाध्यमे आणि डिजिटल मीडियाच्या युगात कीर्तन संस्थांचे महत्त्व कायम आहे. प्रसारमाध्यमांच्या मर्यादा (उदा. प्रत्यक्ष संवाद नसणे, भ्रामक परिणाम, उपचाराचा भाग अधिक) कीर्तनात नसतात.

कीर्तनाचे वैशिष्ट्य:

सामूहिक प्रबोधन: वारकरी कीर्तन ही सामूहिक चिंतन, बोधन, प्रबोधन, श्रद्धावर्धन आणि मनउन्मयन करणारी प्रक्रिया आहे.

सकारात्मक ऊर्जा: सामूहिक चिंतनामुळे आणि संगीत साधनेने सकारात्मक ऊर्जा प्राप्त होते.

लोकसहभाग: वारीतून बृहन्महाराष्ट्रातील लोक जोडले जातात. लोक आत्मियतेसह सहभागी होतात.

फलित: कीर्तन पूर्ण झाल्यावर जमलेले लोक नवी आध्यात्मिक, सर्वांभूती परमेश्वर निष्ठेची आणि अपप्रवृत्ती निवारण्याची मनोवृत्ती घेऊन आस्तिक भाविक बनून कार्यरत होतात.

आध्यात्मिक राजधानी: मानववंशशास्त्रज्ञ इरावती कर्वे यांनी 'पायी वारी करीत पंढरीला पोहोचतो तो देश म्हणजे महाराष्ट्र' अशी व्याख्या केली आहे. पंढरपूर ही आध्यात्मिक राजधानी आहे आणि कीर्तनकार तिचे पाईक आहेत. कीर्तनकार संस्थेचे कार्य हे सर्वशिक्षा अभियानच आहे.

वारकरी कीर्तनकार: प्रबोधनकार व लोकशिक्षक

कीर्तनकाराचे स्थान: वारकरी कीर्तनकार हा लोकधुरिण, आध्यात्मिक गुरू आणि नेता म्हणून मानला जातो. तो महर्षी नारदांची परंपरा चालवतो. म्हणून त्याने प्रबोधनकाराची भूमिका स्वीकारून परमार्थरत राहिले पाहिजे.

तुकोबांचे मार्गदर्शन: जगद्गुरू तुकाराम महाराजांनी 'आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी। बोलिले जे ऋषी। साच भावें वर्ताया ||' तसेच 'पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ।' या उद्घोषणा कीर्तनकारांनी पाळायच्या आहेत.

लोक-व्यवहार: कीर्तनकार हा प्रथम माणूस आणि इहलोकजीवनाचा घटक आहे, त्याला प्रपंचाचे प्रश्न आहेत. तरी त्याने व्रतस्थ राहून व्यवहार साधावा लागतो. लोकांनी त्याच्या व्यवहाराची काळजी घ्यावी आणि त्यानेही कठोरतेने व्यवहार सांभाळावा.


व्यासंग: कीर्तनकाराचा व्यासंग व्यापक, सखोल आणि नेमका असावा. त्याला संगीत, वक्तृत्व, संवाद आणि नाट्यकला अवगत असावी. तो निर्भीड, निर्भय आणि धैर्यवान असावा.

कलेचे सादरीकरण: कीर्तनकार निखळ रंजक कलावंत नसला तरी, कलेचे सादरीकरण भक्तिसाधना प्रक्रिया न सांडता रंजनयुक्त कसे होईल, यावर लक्ष केंद्रित करावे.

राष्ट्रीय नागरिकत्वाचे भान आणि विश्वात्मक भूमिका

जीवनसूत्र: 'प्रपंच करावा नेटका । मग साधावा परमार्थ ।' हे वारकरी भूमिकेचे सूत्र आहे.

राष्ट्रीयत्व प्रथम: वारकरी कीर्तनकाराला अगोदर आपल्या राष्ट्रीयत्वाचे स्पष्ट भान असले पाहिजे, तरच त्याची विश्वात्मक भूमिका सार्थ ठरेल. कुटुंबवत्सलता, ग्राम एकात्मता, समाजशीलता आणि राष्ट्रीय एकात्मभावना कर्तव्यतत्परतेने जपत विश्वात्मक भूमिका अनुसरावी.




विश्वात्मक परमेश्वर: विश्वंभर विठ्ठलाच्या वारकऱ्यांची विश्वात्मक भूमिका विख्यात आहे. विश्वात्मक परमेश्वराचा विचार अंतःकरणात दृढ ठेवून कर्तव्यकर्म साधायचे आहे.

संत ज्ञानोबा ते तुकोबा यांची वारकरी प्रबोधन परंपरा

वस्तुपाठ: माऊली, नामदेव, एकनाथ आणि तुकाराम महाराजांनी प्रपंचात राहून परमार्थ साधण्याचा वस्तुपाठ कीर्तनकारांसमोर ठेवला. त्यांनी पाखंडखंडन करीत अंतरबाह्य स्तरावर समग्र परिवर्तन घडवणारा प्रबोध केला.

ज्ञानदेव: मानवाला आहार-निद्रेसाठी माणूसपणा न दवडण्याचा आणि ज्ञानप्राप्तीसाठी मनाला हरिचरण कमळांचे न सोडण्याचा उपदेश करतात.

नामदेव: हरिभजन नसलेल्या ग्राम, आश्रम, संपत्ति आणि वाचेत सर्वेश्वर नसलेला आचार याला 'धिग धिग' म्हणतात.

एकनाथ: 'मी मी'पणा टाकून कृष्णार्पण करण्याचा प्रबोध केला.

तुकोबाराय: प्रबोधन परंपरेचा कळसाध्याय रचला. त्यांनी सामाजिक, राजकीय, नैतिक, धार्मिक, आध्यात्मिक विषयांवर भाष्य केले. त्यांनी शिवाजी महाराजांना राष्ट्र-राज्य उभारणीचा आदर्शपाठ दिला आणि सामाजिक विषमतेवर प्रहार करून आध्यात्मिक लोकशाहीची चळवळ साधली.

प्रबोधन परंपरा पुढे नेण्याची जबाबदारी व आव्हाने

सद्यस्थिती: आज भारतीय समाज जातीपातींच्या विषमतेत दुभंगतो आहे. भौतिक साधने शारीरिक व मानसिक अपंगत्व आणू पाहात आहेत, अनाचार, दंभाचार, भ्रष्टाचार बोकाळला आहे आणि नकारात्मक मनोवृत्तीच्या आहारी समाज जात आहे.

आव्हान: या परिस्थितीतही वारीला येणाऱ्या समाजात होणारी वाढ, ही लोकांना यातून बाहेर पडण्याची आस आहे. हा विश्वास सार्थ करण्याचे आव्हान कीर्तनकारांना पेलायचे आहे.

प्रसन्नमनस्क समाजनिर्मिती: कीर्तनकारांपुढे प्रसन्नमनस्क समाजनिर्मितीचे आव्हान आहे. त्यांनी माऊलीच्या ममतेने प्रश्न समजावून घेऊन प्रबोधन करावे, कुचेष्टात्मक टीका करू नये.

संमेलनात अपेक्षित प्रबोधनाची दिशा:

शेती आणि शेतकरीविषयक: कर्जबाजारीपणा, आत्महत्या आणि नकारात्मक मानसिकतेवर सकारात्मक भाष्य करीत 'स्वत्वा'चे जागरण करणे.

व्यसनाधीनता, चंगळवाद, विवेकशून्यता: कौटुंबिक आणि सामाजिक प्रश्नांच्या मुळावर प्रहार करणे.

राष्ट्रधर्म जागरण: महाराष्ट्रात छत्रपती शिवरायांचा आदर्श ठेवून भारतीय राष्ट्रवादाची कास धरणे आणि अध्यात्म लक्ष्यी पद्धतीने व्यापक एकात्म राष्ट्रीय भावना तीव्र करणे.

वैश्विक मानव्याचे जागरण: सहिष्णुता, प्रेम, सेवा हे ब्रीद जपत राष्ट्रधर्माबरोबर **'वसुधैव कुटुंबकम्'**ची जाणीव करून देणे.

लोकसंख्या आणि स्त्रीपुरुष संबंध: नैतिकता आणि कुटुंबवत्सलतेची पेरणी करणे.

विज्ञाननिष्ठा, बुद्धिप्रामाण्य आणि अंधश्रद्धा निर्मूलन: अंधश्रद्धांवर प्रखर विरोध दर्शवताना आस्तिकता धोक्यात न येण्याची दक्षता घेऊन विवेकपूर्ण प्रबोधन करणे.

पर्यावरण संरक्षण, जलव्यवस्थापन, आरोग्यरक्षण: संतांच्या संदर्भासह अध्यात्मकेंद्री पद्धतीने प्रबोधन घडवणे.

अंतिम अपेक्षा: वारकरी कीर्तनकाराने धर्म रक्षण्याचे व्रत आचरून, अवघा समाज सत्वपूर्ण, सात्विक आणि आस्तिक करण्याचा प्रयत्न करून व्यष्टी आणि समष्टीची एकात्मता साधणे अपेक्षित आहे.




### जालन्यात राष्ट्रवादी युवक काँग्रेसला नवी चालना

# युवानेते अझहर शेख बदनापूरकर यांची जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती

**बदनापूर । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात राष्ट्रवादी युवक काँग्रेसला बळ मिळावे आणि संघटन अधिक प्रभावीपणे कार्यरत रहावे, या उद्देशाने युवानेते अझहर शेख बदनापूरकर यांची जालना जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंद चव्हाण यांनी ही नियुक्ती अधिकृत केली असून या निर्णयाचे जिल्ह्यातील युवकांमध्ये मोठ्या उत्साहाने स्वागत केले जात आहे.

युवानेते अझहर शेख हे पक्षनिष्ठ, कार्यतत्पर आणि सामाजिक भान असलेले कार्यकर्ते म्हणून परिचित आहेत. युवकांना संघटनेशी जोडण्याचे त्यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न, जनसंपर्काची ताकद आणि संघटनशक्ती लक्षात घेता ही महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली असल्याचे जिल्हाध्यक्ष चव्हाण यांनी नमूद केले. राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली युवा संघटना आणखी सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

युवा नेतृत्वाला बळ - संघटन विस्तारास नवा वेग

जालना जिल्ह्यात युवकांपर्यंत पक्षाची विचारधारा पोहोचवणे, गावागावात संघटन विस्तार करणे, युवा प्रश्नांवर ठोस भूमिका घेणे आणि नव्या नेतृत्वाला प्रोत्साहन देणे या जबाबदाऱ्या आता युवानेते अझहर शेख यांच्या खांद्यावर आहेत. त्यांच्या नेतृत्वक्षमतेमुळे युवकांमध्ये त्यांची लोकप्रियता वाढत असून हीच ऊर्जा संघटनवाढीसाठी निर्णायक ठरणार आहे.

युवानेते अझहर शेख यांनी बेरोजगारी, शिक्षण, युवा हक्क, अन्यायाविरोधातील लढा तसेच स्थानिक समस्यांवर सक्रिय भूमिका घेत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कार्यामुळे युवा वर्गात त्यांच्याबद्दल विश्वास निर्माण झाला असून त्यांच्या नियुक्तीमुळे युवक काँग्रेस जालना जिल्ह्यात आणखी मजबूत होईल, असे कार्यकर्त्यांचे मत आहे.

पक्षप्रवेशानंतरच मोठी जबाबदारी - कार्यकर्त्यांचा उत्साह उंचावला



अलीकडेच जालना जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट) च्या बैठकीत मोठ्या जल्लोषात युवानेते अझहर हाजी सत्तार शेख यांनी पक्षप्रवेश केला आणि तत्काळ त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना जिल्हा युवक उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. या कार्यक्रमाला जिल्हाध्यक्ष व माजी आमदार अरविंदजी चव्हाण,युवा नेते धैर्यशील चव्हाण,प्रदेश युवक सचिव अर्शद बागवान, जिल्हा कार्याध्यक्ष चंद्रकांत कारके, जालना तालुका अध्यक्ष संतोष ढेगळें . महाराष्ट्र मुस्लिम युवक प्रतिष्ठानचे जालना जिल्हा अध्यक्ष.हाफिज हारुन पठाण,यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. युवानेते अझहर शेख म्हणाले, मा. अरविंद अण्णांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास ही माझ्यासाठी सन्मानाची बाब आणि मोठी जबाबदारी आहे. संघटनवाढ, युवा प्रश्नांना प्राधान्य आणि पक्षाची विचारधारा प्रत्येक गल्लीपर्यंत पोहोचवण्याचे काम मी प्रामाणिकपणे करणार आहे. माझा कामाचा मंत्र आहे - २० % राजकारण आणि ८० % समाजकारण.

युवकांसाठी रचनात्मक नेतृत्वाची हमी

जालना जिल्ह्यातील युवकांना मार्गदर्शन, त्यांच्या समस्या सोडवणे, त्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवणे यावर ठोस काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. कोणत्याही समाजातील कोणत्याही व्यक्तीला जर माझ्याकडून काम असेल, तर मी ते निस्वार्थपणे पूर्ण करेन, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

त्यांच्या नियुक्तीमुळे जिल्हाभरात उत्साहाचे वातावरण असून अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांनी त्यांचे जोरदार स्वागत केले. जिल्हाध्यक्ष अरविंदजी चव्हाण यांनी व्यक्त केलेला विश्वास, आणि युवकांचा वाढत चाललेला पाठिंबा पाहता आगामी काळात राष्ट्रवादी युवक काँग्रेस जालना जिल्ह्यात नव्या जोमाने काम करेल, याबाबत सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे. राष्ट्रवादी युवक काँग्रेसमध्ये नवचैतन्य - नेतृत्वाच्या नव्या पर्वाची सुरुवात!

# जालना महानगरपालिकेची स्वच्छता मोहीम वेगात

### श्रमदान अभियानाची सुरुवात; कचरा जाळणाऱ्यांवर कारवाई




**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर स्वच्छ व सुशोभित करण्याच्या उद्देशाने जालना शहर महानगरपालिकेने आज शुक्रवार, दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता व्यापक श्रमदान अभियानाची सुरुवात केली. या मोहिमेला मामा चौकातून प्रारंभ झाला.

**हुतात्मा जनार्धन मामा पुतळ्यास अभिवादन**
मोहिमेच्या प्रारंभी मा. जिल्हाधिकारी तथा आयुक्त - जालना महानगरपालिका यांनी मामा चौकातील हुतात्मा जनार्धन मामा यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी उपस्थित सर्वांनी पुतळ्यास अभिवादन केले. त्यानंतर इम्पॅक्ट ॲडव्हर्टायझिंग यांनी स्थापलेल्या मार्गदर्शक फलकाचे उद्घाटन करून श्रमदानाला औपचारिक सुरुवात देण्यात आली.

मोहिमेअंतर्गत खालील परिसरात मोठ्या प्रमाणात स्वच्छता करण्यात आली, मामा चौक ते हॉटेल विजय विलास रोड, महावीर चौक, अलंकार टॉकीज चौक, सिंधी बाजार क्षेत्र, खवा मार्केट, सुभाष रोड, मुख्य मार्केट परिसर, महेंद्र एजन्सी परिसर, या संपूर्ण प्रभागात रस्त्यांच्या दोन्ही बाजूंची झाडाझडती, नाली सफाई, कचऱ्याचे ढिग उचलणे, तसेच घाणेरड्या जागांची स्वच्छता अशी व्यापक कामे हाती घेण्यात आली.

**कचराजाळणाऱ्यांवरतत्काळदंडात्मककारवाई**
महानगरपालिकेने मोहिमेदरम्यान नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली, गरीबशहा बाजार येथे कचरा जाळणाऱ्या व्यक्तींवर रु २,००० दंड, खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी गाडीच्या शेजारी कचरा टाकल्याबद्दल रु २,००० दंड एकूण रु ४,००० दंडाची वसुली मनपाकडून करण्यात आली.

**अधिकारी, कर्मचारी व सामाजिक संस्थांचा मोठा सहभाग** मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी खालील मान्यवर व कर्मचारी उपस्थित होते, श्रीमती आशिमा मित्तल, आयुक्त तथा प्रशासक, जालना मनपा, अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम, उपायुक्त नंदा गायकवाड, सहाय्यक आयुक्त अपर्णा जाधव, सहाय्यक आयुक्त केशव कानपुडे, सर्व स्वच्छता निरीक्षक, मनपा कर्मचारी व अधिनस्त सफाई कर्मचारी, शहरातील विविध सामाजिक संस्था व स्वयंसेवक सर्वांनी एकत्र येऊन प्रभागातील स्वच्छता मोहिमेत सक्रीय सहभाग नोंदवला.

**नागरिकांना मनपाकडून आवाहन**
आयुक्त व प्रशासक मा. आशिमा मित्तल यांनी शहरातील नागरिकांना महत्त्वाचे आवाहन केले, शहरात कुठेही कचरा जाळू नये कचरा जाळताना आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल. कोणत्याही भागात कोणी कचरा जाळत असल्यास त्वरित महानगरपालिकेच्या निदर्शनास आणून द्यावे त्यांनी सांगितले की, स्वच्छ आणि सुंदर जालना शहर घडवण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक आहे.

# प्रभाग आठ मध्ये स्ट्रीट लाईट दुरुस्तीकरण

### दिनेश भगत व दुर्गेश काठोठीवाले यांच्या प्रयत्नांना यश

जालना । प्रतिनिधी - शहरातील प्रभाग क्रमांक आठ मध्ये अंधाराच्या समस्याने नागरिक त्रस्त होते. याबाबत वारंवार महानगर पालिका तसेच महावितरणकडे येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी पाठपुरावा केला. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून या प्रभागात स्ट्रीट लाईट दुरुस्तीकरणासह आता नवीन लाईट बसविण्याच्या कामास सुरुवात झाली आहे. दिनेश भगत व दुर्गेश काठोठीवाले यांनी यासाठी प्रयत्न केले आहेत.



आमदार अर्जुनराव खोतकर व भास्कर अंबेकर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनेश भगत, दुर्गेश काठोठीवाले यांनी प्रभाग आठ मधील विविध समस्यां सोडविण्यावर नेहेमीच भर दिला आहे. या भागातील स्वच्छता, नाल्या, रस्ते, स्ट्रीट लाईट आदी विकास कामांसाठी महानगर पालिकेसह जिल्हा स्तरावर पाठपुरावा त्यांनी केला. गेल्या अनेक दिवसांपासून प्रभाग आठ मध्ये अंधाराचे साम्राज्य निर्माण झालेले होते. यासाठी दिनेश भगत व दुर्गेश काठोठीवाले यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून या भागात शुक्रवार (दि १२) रोजी स्ट्रीट लाईट दुरुस्तीकरण व नवीन लाईट बसविण्यास सुरुवात झाली



आहे. यावेळी माधुमामा, जीवन भगत, सुनिल नंद, विक्की विजयसेनानी, अर्जुन फतेलष्करी आदींची उपस्थिती होती.

# होमगार्ड वर्धापन दिन उत्साहात साजरा

**जालना । प्रतिनिधी -** जालना येथील होमगार्ड कार्यालयाकडून ७९ वा होमगार्ड वर्धापन दिन होमगार्ड जिल्हा समादेशक तथा अपर पोलिस अधिक्षक आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरा करण्यात आला.

जिल्हा होमगार्ड कार्यालय जालना तर्फे ७९ वा वर्धापन दिनानिमित्त दि.८ डिसेंबर २०२५ पासून वर्धापन सप्ताह साजरा करण्यात येत आहे. सप्ताहाअंतर्गत विविध उपक्रम, कार्यक्रम राबविण्यात आले. यामध्ये वृक्षारोपण, स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तसेच दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा होमगार्ड कार्यालय जालना येथे ध्वजारोहण व पथसंचलन आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे मुख्य अतिथी जिल्हा समादेशक होमगार्ड तथा अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा व वृक्षारोपनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या प्रसंगी प्रशासकीय अधिकारी किशोर राठोड, केंद्र नायक राजेंद्र शेळके, तालुका समादेशक शरद मोरे, पुंडलिक अंभोरे (पलटन नायक), के.एम शेख (पलटन नायक), ए. बी. पठाण, श्री. शेजुळ व समस्त होमगार्ड महिला व पुरुष सैनिकांची या प्रसंगी मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.